# <u>प्रेसनोट</u>

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 96/2022 दिनांक : 06.03.2022

## 1)खुनाचा प्रयत्न :—

**नायगाव :—**दिनांक 02.03.2022 रोजी चे 10.30 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे घराचे बाजुस लालवंडी ता. नायगाव जि. नांदेड येथे,** यातील नमुद तिन आरोपीतांनी जे.सी.बी. मशीन ने त्यांचे घर पाडत असताना यातील फिर्याद व त्याची पत्नी यांनी आरोपीतांना तुमची पाटभिंत पडत असताना आमचे भिंतीचे नुकसान होऊ देऊ नका असे समजावुन सांगत असताना आरोपीतांनी संगणमत करुन तुझं नेहमीचच झालयं तुला खतम करावे लागते असे म्हणुन जिवे मारण्याचे उद्देशाने कुऱ्हाडीचे तुंब्याने फिर्यादीचे डोक्यात मारुन गंभीर जखमी केले, लोखंडी सबलीने हातावर मारुन हात फॅक्चर केले, फिर्यादीचे पत्नीस फावडयाने मारुन जखमी केले व जिवे मारण्याची धमकी देवून खुन करण्याचा प्रयत्न केला. वगैरे **फिर्यादी मारोती महाजन कोंपलवार, वय 39 वर्षे, व्यवसाय शेती रा. लालवंडी ता. नायगाव जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे नायगाव** गुरन 37/2022 कलम 307,326,324,323,506,34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोनि/श्री शिंदे, मो. नं. 8975769508** हे करीत आहेत.

## 2)जबरी चोरी :—

**शिवाजीनगर :—**दिनांक 05.03.2022 रोजी चे 22.50 वा. चे सुमारास, **मोरे हॉस्पीटल समोर,शिवाजीनगर नांदेड येथे,** यातील अज्ञात दोन आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादी पारसनगर ते रेल्वेस्टेशन वाहन नसल्याने अंधारातुन पायी जात असतांना आरोपीतांनी खंजरचा धाक दाखवुन खिशातील नगदी 2,000/—रुपये व मोबाईल बळजबरीने काढुन घेतला. वगैरे **फिर्यादी आभिजीत रामराव देशमुख वय 45 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. इस्मामपुरा ता. किनवट जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 87/2022 कलम 392,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री गायकवाड**, **मो.क्रं. 9890018039** हे करीत आहेत.

## 3)मो. सा. चोरी :—

**विमानतळ :—**दिनांक 15.02.2022 रोजी चे 19.45 ते 21.00 वा. चे दरम्यान, **माता गुजरी चौकी दारुच्या दुकानाजवळ, नांदेड येथे,** यातील फिर्यादीची हिरो कंपनीची पॅशन प्रो. मो सा क्र. एमएच—26/बीके—8293 किंमती 40,000/—रुपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी सय्यद चॉद पाशा सरवर, वय 46 वर्षे, व्यवसाय वेल्डींगकाम रा. कर्मविरनगर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 73/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/1792 लोखंडे, मो.क्र. 9527810006** हे करीत आहेत.

## 4)चोरी :—

**नांदेड ग्रामीण :—**दिनांक 02.03.2022 रोजी चे 09.00 वा. ते दिनांक 03.02.2022 रोजी चे 06.00 वा. चे दरम्यान, **डॉ. शंकरराव चव्हाण वैद्यकीय महाविदयालय, रायगड बिल्डींग विष्णुपुरी, नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे मुलाची सायकल किंमती 8,000/—रुपयाची नमुद आरोपीने चोरुन नेली आहे. वगैरे **फिर्यादी मारोती दिंगबरराव डाके, वय 41 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. डॉ. शंकरराव चव्हाण वैद्यकीय महाविदयालय, रायगड बिल्डींग विष्णुपुरी, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 128/2022 कलम 379, भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/124 गवळी**, **मो.क्र. 8208681527** हे करीत आहेत.

## 5)गंभीर दुखापत :—

**इतवारा :—**दिनांक 05.03.2022 रोजी चे 01.30 वा. चे सुमारास**, शांतीनगर, इतवारा नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने फिर्यादीस तु आमचे साठी काय कमवुन ठेवला आहेस मला दारु पिण्यासाठी पैसे दे म्हणुन शिवीगाळ करुन हातात विट घेवून फिर्यादीचे तोंडावर मारून तीन दात पाडुन गंभीर दुःखापत केली व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी रवी नागोराव जोंधळे, वय 50 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. शांतीनगर, इतवारा नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरन 40/2022 कलम 325,324,504,506 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोह/1821 रसुल, मो. नं. 02462236510** हे करीत आहेत.

# 6)शासकीय कामात अडथळा :-

**1)लिंबगाव :-** दिनांक 05.03.2022 रोजी चे 11.45 वा. चे सुमारास, **आरोपीचे घरासमोर सार्वजनिक रोडवर मौजे मरळक (बु.) ता. जि. नांदेड येथे**, यातील फिर्यादी व त्यांचे सहकारी थकीत बिल वसुली करत असताना यातील नमुद आरोपीने घरासमोरील लघु दाबाचे विज वाहीनीवर वायरचे आकोडे टाकुन अनाधिकृतपणे विज चोरी करताना दिसले त्यावेळी फिर्यादीने आरोपीस तुम्ही आकोडे टाकुन विज चोरी का करता असे विचारले असता अरोपीने शिवीगाळ करुन फिर्यादीचे शर्टाचे कॉलर धरुन पाठीत थापडा बुक्याने मारहाण केली तसेच सोबतचे साक्षीदार यांना मारहाण करुन जिवे मारण्याची धमकी देवून शासकीय कामात अडथळा निर्माण केला. वगैरे **फिर्यादी अच्युत व्यंकटराव पांचाळ, वय 27 वर्षे, व्यवसाय नौकरी (तंत्रज्ञ) महावितरण ग्रामीण शाखा-2 नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लिंबगाव** गुरनं 26/2022 कलम 353,332,504,506 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोउपनि/श्री सुर्यवंशी, मो.क्र. 9011472277** हे करीत आहेत.

**2)उस्माननगर :-** दिनांक 04.03.2022 रोजी चे 17.15 वा. चे सुमारास, **मौजे कापशी (बु.) विज ग्राहक सुशिलाबाई बैलके यांचे घरासमोर ता. लोहा जि. नांदेड येथे**, यातील फिर्यादी हे विज ग्राहक सुशिलाबाई बैलके यांचे कडुन थकीत बिल वसुली करत असताना यातील नमुद आरोपीने फिर्यादीचे हातातील वसुल केलेल्या विज बीलाचे पैसे बघुन तू लाच घ्यायलास काय ? तुम्ही लोकांन कडुन पैसे खाता म्हणुन अश्लिल भाषेत शिवीगाळ करुन फिर्यादीस लाथा बुक्याने मारहाण केली तसेच जिवे मारण्याची धमकी देवून शासकीय कामात अडथळा निर्माण केला. वगैरे **फिर्यादी शेख हुसेनसाब अल्लाऊदीन, वय 32 वर्षे, व्यवसाय नौकरी (तंत्रज्ञ) महावितरण शाखा कापशी (बु.) ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उस्माननगर** गुरनं 32/2022 कलम 353,323,294,506 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोनि/श्री देवकत्ते, मो.क्र. 8381029490** हे करीत आहेत.

# 7)फसवणुक :-

**सोनखेड :-** दिनांक 05.03.2022 रोजी चे 11.45 वा. सुमारास, **सोनखेड ते कारेगाव दरम्यान ता. लोहा जि.नांदेड येथे,** यातील फिर्यादी हे नांदेड ते सोनखेड येथे बसने प्रवास करुन सोनखेड बसस्टॅड वर उतरले व फिर्यादीच्या मुलीची पर्स बसमध्ये सिटवर विसरुन ती बस खाली उतरली असता थोडया वेळाने लक्षात आल्यानंतर फिर्यादी हा बसचा पाठलाग करत कारेगाव पर्यंत जाऊन बस थांबवुन विचारणा केली असता कंडक्टर यांनी सांगितले की तुमच्या नातेवाईकांनी पर्स घेवून गेला तो मोटार सायकल क्रं. एम.एच./11-एयु असा होता त्यांनी बॅग घेवून गेला. तो आमचा नातेवाईक नसताना अनोळखी ईसमाने कंडक्टर यांची बतावणी करुन माझ्या मुलीची पर्स व त्यात असलेले सोन्याचे दागीने व मोबाईल,नगदी असा एकुण 1,52,,000/- रुपयेचा मुद्देमाल चोरुन नेला. वगैरे **फिर्यादी सिध्देश्वर वैजनाथ मोगरकर, वय 64 वर्षे, रा. व्यवसाय शेती रा. परळी वैजनाथ ता. परळी जि. बीड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे सोनखेड** गुरन 35/2022 कलम 419,403 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/1957 भुत्ते मो.नं. 9421292819** हे करीत आहेत.

# 8)गळफास घेवुन मृत्यु :-

**भोकर :-**दिनांक 05.03.2022 रोजी चे 11.00 ते 15.00 वा. दरम्यान वेळ नक्की नाही, **मौजे नागापुर शिवारातील ता. भोकर जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे राजु ग्यानोबा पुंजरवाड, वय 35 वर्षे, व्यवसाय शेती रा. नागापूर ता. भोकर जि. नांदेड**, हा दोन दिवसापासून ताप येत असल्याने त्याने आजारास कंटाळुन शेतातील लिंबाचे झाडाला गळफास घेवुन आत्महत्या केली. वगैरे **खबर देणार ग्यानोबा विठ्ठल पुंजरवाड, वय 65 वर्षे, व्यवसाय शेती रा. नागापूर ता. भोकर जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे भोकर** आ. मृ. **18**/2022 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/2058 कदम, मो.नं. 9049320582** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड